श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑक्टोबर २०२२ | वर्ष-१०, अंक - १० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## डेरवण येथे शास्त्रीय सल्लागार समितीची (SAC) सभा



दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात संस्थेच्या शास्त्रीय सल्लागार समितीची सभा पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. संस्थेच्या विविध प्रकल्पांचा आणि कामकाजाचा विस्तृत आढावा घेणारी प्रदीर्घ चर्चा या वेळी करण्यात आली. समिती सभासदांव्यतिरिक्त रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयातील निवडक डॉक्टर्स, प्रोफेसर्स आणि कर्मचाऱ्यांनाही यामध्ये सहभागी करून घेण्यात येऊन डॉ. काकोडकर यांनी सर्वांनाच आपले विचार मांडण्याची संधी दिली आणि त्यामुळे चर्चा अत्यंत व्यापक स्वरूपात झाली.

डॉ. काकोडकर या वेळी बोलताना म्हणाले, ''आपण सगळे जेव्हा जेव्हा भेटतो तेव्हा दरवेळी मीटिंगचा अजेंडा अधिकाधिक व्यापक आणि भरगच्च होताना दिसत आहे. याचाच अर्थ येथे बरेच काम होत आहे. मला असे वाटते की येथे जे होत आहे, ते या भागासाठी तर महत्त्वाचे आहेच, पण मागासलेल्या भागात कशा तऱ्हेने 'इकोसिस्टिम' विकसित करावी यासाठी हे काम मार्गदर्शकही आहे. हे सगळे या संस्थांचे निर्माते, विशेषत: दोन्ही ट्रस्ट्स आणि त्यांचे प्रमुख श्री. वालावलकर यांची भविष्यवेधी दृष्टी आणि त्यांची या भागाशी असलेली बांधिलकी यामुळेच शक्य झाले आहे. तेच या प्रगतीचे आणि समग्र सुधारणेचे मूलतत्त्व आहे. आणि आपण येथे 'सॅक कमिटी'त त्याला अधिक संशोधनाची जोड देतो. त्यामुळे संस्थेला अधिक बळ मिळते आणि स्थिरपणा प्राप्त होतो.

डॉ. रामास्वामी म्हणाले, ''हा अजेंडाच या कॅम्पसमध्ये झालेल्या उत्क्रांतीचे प्रतीक आहे. खरेतर ती आपोआपही झाली असती, पण सॅकने तुम्हाला एक विशिष्ट दिशा दिली आहे. आपले स्थान अगदी विशेष आहे. या संस्थेचे एकमेवाद्वितीयत्व हे त्याचे भौगोलिक स्थान आहे. बरेचसे शास्त्रज्ञ आपले संशोधन, पेपर प्रसिद्ध करणे हे कशाला करतात? तर परदेशातील आपल्यासारख्या शास्त्रज्ञांकडून मान्यता मिळवण्यासाठी. पण असा विचार करण्यामध्ये आपल्या कामामागचा हेतूच निकामी होतो. आपल्या कृतीमागची प्रेरणा, हेतू याला येथे फार महत्त्व

दिलेले आहे. संशोधन हे असे एका सरळ रेषेत जाणारे नसते. दोन-तीन वर्षांच्या कालावधीत, कप्प्यात त्याकडे पाहिले तर प्रश्न निर्माण होतात. किमान तीन पिढ्यांच्या एकत्रित प्रयत्नाकडे पाहावे लागेल. म्हणून मला संस्थेचे, त्यांनी विश्वासाने सोपविलेल्या जबाबदाऱ्यांसाठी आणि केलेल्या गुंतवणुकीसाठी, अभिनंदन केले पाहिजे. आपण आता 'जेनोमिक्स'विषयी बोलत आहोत. पण याची सहा वर्षांपूर्वी मी कल्पना करू शकलो नसतो. येथील स्थानिक लोकांची जेनेटिक घडण ही भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकारची अशी आहे, आणि त्याचा अभ्यास करण्याची दुर्मीळ संधी येथे उपलब्ध आहे. आपण शास्त्र आता 'वैश्विक' झाल्याचे बोलतो पण स्थानिक लोकांमधील काही महत्त्वाच्या समस्यांचा अभ्यास जागतिक संदर्भातही महत्त्वाचा आहे. संशोधनाचे तंत्र उपकरणांवर नव्हे तर संशोधन करणाऱ्या लोकांवर अवलंबून असते.''

डॉ. ऋता मुल्हेरकर यांनी संशोधकांसाठी डेरवणची संस्था ही 'सोन्याची खाण'च आहे असे आपले मत व्यक्त केले.

डॉ. श्रीपाद बाणावली यांनी असे विचार व्यक्त केले की आता महाविद्यालय अधिक संख्येने मुलांना प्रवेश देत आहे आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमही आता सुरू झाला आहे. त्यामुळे आता या नव्याने डॉक्टर होणाऱ्यांच्या शिक्षणाची संस्थेची जबाबदारी वाढली आहे. संस्थेची प्रगती करण्याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांची प्रगती करणे आणि त्यांना शिक्षणात आणि संशोधनात गुंतवून ठेवणे हीसुद्धा संस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना संशोधनप्रवण करण्याचे काम ही संस्था करीत आहेच आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टीपुढे नवी क्षितिजे खुली होतील.

प्रा. डॉ. चंद्रशेखर गर्दे म्हणाले की आपला उद्योगांशी चांगला संपर्क आहे. तेव्हा इंजिनीअरिंग कॉलेज, इंडस्ट्रीज आणि वालावलकर संस्था यांनी एकत्र येऊन एखादे उत्पादन करता येईल. तेथे एम.बी.बी.एस., बी. टेक. आणि बायोमेडिकल टेक्नॉलॉजी विद्यार्थी एकत्र काम करतील आणि विचारांचे आदानप्रदान होईल आणि असे आदानप्रदान होणे चांगले ठरेल.

डॉ. आनंद जोशी यांनी सांगितले की आम्ही महाविद्यालयातील मुलांना व्यसनाधिनता, पोषक आहार अशा विषयांवर लेख लिहायला प्रोत्साहन देत आहोत. त्यासाठी अमेरिकेतील प्रोफेसरांबरोबर आम्ही सेमिनारही आयोजित करतो आणि विद्यार्थी 'केस प्रेझेंटेशन' करतात.

डॉ. सुनील नाडकर्णी म्हणाले की डेरवण हे स्थान वेगळेच आहे. येथे प्रश्नच प्रश्न आहेत. पण जर आम्ही योग्य तऱ्हेने ते सोडविले तर त्यांची उत्तरे जगालाही उपयुक्त ठरतील.

डॉ. अरविंद नातू यांनी, 'येथे एकाच वेळी अनेक गोष्टींचा विस्तृत पट मांडला जात आहे. तेव्हा नवे प्रकल्प हाती घेताना आपली क्षमता आणि मर्यादा यांचा विचार केला पाहिजे. अनेक प्रकल्प सुरू करण्याऐवजी निवडक प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करून झटून त्यांचा पाठपुरावा केला पाहिजे' असे आपले मत व्यक्त केले.

## 'एल. आय. सी.'कडून वालावलकर रुग्णालयात 'सी-आर्म मशीन' भेट




*सी-आर्म मशिनचे उद्घाटन करताना डावीकडून मा. के. जी. दर्जी आणि मा. अभय कुलकर्णी*




*सी-आर्म मशीन सोबत डावीकडून श्री. साईनाथ मेस्त्री, श्री. प्रमोद गुळवणी, संस्थेचे विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, श्री. अभय कुलकर्णी, श्री. के. जी. दर्जी, डॉ. आनंद जोशी, डॉ. नेताजी पाटील, श्री. नरेंद्र तिनेकर व संस्थेचे विश्वस्त श्री. बाळासाहेब काजरेकर*

सोमवार, दि. १९ सप्टेंबर २०२२ रोजी गोल्डन ज्युबिली फाऊंडेशन (L.I.C. of Indi) यांनी डेरवण रुग्णालाला भेट दिलेले 'सी-आर्म मशीन' कार्यान्वित झाले. अत्यंत अल्प दरात देण्यात येणाऱ्या या सेवांचा लाभ ग्रामीण भागातील जनतेला होणार आहे. 'सी-आर्म मशीन'चे उद्‌घाटन श्री. के. जी. दर्जी – (Regional Manager - Corporate Communications, LIC of India - Western Zone Mumbai) आणि श्री. अभय कुलकर्णी – (Senior Divisional Manager) यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटन समारंभाला संस्थेचे विश्वस्त श्री. अशोकराव जोशी तसेच चिपळूण शाखेचे श्री. नरेंद्र तिनेकर आणि श्री. साईनाथ मेस्त्री (ब्रँच मॅनेजर) आणि एल.आय.सी., मुंबई विभागातील इतर कर्मचारी तसेच कोल्हापूर आणि मुंबई शाखेतील इतर एल.आय.सी. सदस्य उपस्थित होते. मा. के. जी. दर्जी आणि मा. अभय कुलकर्णी यांनी केवळ आरोग्य क्षेत्रातच नव्हे तर कोकण विभागातील ग्रामीण भागात शिक्षण आणि सामाजिक जागृतीसाठी डेरवण ट्रस्टने दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल संस्थेचे आभार मानले.

सी-आर्म मशिन हे अस्थिभंग, मणक्यांवरील शस्त्रक्रिया, मुतखड्यांवरील शस्त्रक्रिया आदीसाठी वापरले जाते.

## जिल्हा शासकीय रुग्णालय, रत्नागिरीला वालावलकर रुग्णालयाचा मदतीचा हात

रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची मोठी कमतरता असून यातून मार्ग काढण्यासाठी वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाने मदतीचा हात दिला आहे. वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (एम. डी./एम.एस.) शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांची नियुक्ती टप्प्याटप्प्याने जिल्हा रुग्णालयात करण्यात येणार आहे. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयामधील डॉक्टरांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात केलेल्या मदतीमुळे रत्नागिरीच्या रुग्णालयात रुग्णांना उत्तम वैद्यकीय सेवा देणे शक्य झाले आहे अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संघमित्रा फुले व डॉ. एस. एम. गावडे यांनी देऊन याबद्दल डेरवण रुग्णालयाचे आभार मानले आहेत.



*डावीकडून डॉ. स्मृती शर्मा, डॉ. खुशबू वोतावत व डॉ. एस. एम. गावडे (जिल्हा शल्य चिकित्सक)*



*डावीकडून डॉ. निखिल जाधव, डॉ प्रताप शेटे, डॉ. अभिजित भोसीकर, डॉ. रविकिरण आंधळे, डॉ. सैयम शाह*



*डावीकडून – डॉ. प्रताप शेटे, डॉ. अभिजित भोसीकर, डॉ. सैयम शाह डॉ. रविकिरण आंधळे, डॉ. एस. एम. गावडे (जिल्हा शल्य चिकित्सक) आणि उजवीकडून पहिले डॉ. निखिल जाधव,*

## सुगंध आणि सुरस विकास केंद्र (एफएफडीसी) कन्नौज, लखनऊला डेरवण रुग्णालय टीमची भेट



*सुगंध आणि सुरस विकास केंद्रात डावीकडून डॉ. अपर्णा जोशी, डॉ. अनघा संत, श्री. शक्ती विनय शुक्ला (फ्रॅग्रन्स अँड फ्लेवर संचालक), श्री. अमित साळवी, डॉ. सुवर्णा पाटील*

सुगंध आणि सुरस विकास केंद्र (FFDC) ची स्थापना १९९१ मध्ये MSME मंत्रालय, भारत सरकारद्वारे आणि उत्तर प्रदेश सरकारच्या मदतीने करण्यात आली आहे.
एफएफडीसीचे उद्दिष्ट अत्यावश्यक तेल, सुगंध आणि चव उद्योग आणि कृषी तंत्रज्ञान आणि रासायनिक तंत्रज्ञान या दोन्ही क्षेत्रात संशोधन आणि विकास संस्था यांच्यात संवाद साधण्याचे आहे. केंद्राचे मुख्य उद्दिष्ट हे सुगंधी लागवड आणि त्याच्या प्रक्रियेत गुंतलेले शेतकरी आणि उद्योग यांची सेवा करणे, टिकवून ठेवणे आणि त्यांची स्थिती सुधारणे हे आहे, जेणेकरून त्यांना स्थानिक आणि जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक बनवता येईल. गोरगरीब जनेतला यांचा उपयोग करता यावा आणि त्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वालावलकर हॉस्पिटल, डेरवणमध्ये लवकरच या विषयी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे.

## विश्वकर्मा इन्स्टिटयुट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (व्ही.आय.आय.टी.) पुणे, यांच्याबरोबर सामंजस्य करार




*डावीकडून डॉ. अतुल कुलकर्णी, डॉ. चंद्रशेखर गर्दे, डॉ. श्रद्धा हब्बू, डॉ. प्रशांत जोशी, विवेक देशपांडे (संचालक, व्ही. आय. आय. टी), प्रो. अरविंद यादव, प्राचार्य डॉ. विजय डोंबले, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. अमर बारवाडे व समर्थ एज्युकेशन इन्स्टिट्युटच्या संचालिका शरयू यशवंतराव.*

विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (व्ही.आय. आय.टी ), पुणे आणि डेरवण येथील बी.के.एल. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला असून या करारांतर्गत प्राध्यापक/विद्यार्थी देवाणघेवाण, विद्यार्थी अंतर्वासिता, संशोधन सहकार्य अशा विविध उपक्रमांचे आयोजन दोन्ही आस्थापनच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे.

या करारासाठी वालावलकर वैद्यकीय महाविद्यलयाच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील (एम.डी., मेडिसिन), प्राचार्य डॉ. विजय डोंबले (प्राध्यापक, पॅथॉलॉजी), प्राध्यापक अरविंद यादव, डॉ. अमर बारवाडे, समन्वयक (प्राध्यापक, शरीरविज्ञान), समर्थ एज्युकेशन इन्स्टिट्युटच्या संचालिका शरयू यशवंतराव, वरिष्ठ संशोधक डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. नेताजी पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी (स्पाईन ऑर्थोपेडिक सर्जन)आणि कॉलेजचे अन्य प्राध्यापक उपस्थिती होते.

व्ही.आय.आय.टी. महाविद्यालयाचे डॉ. विवेक देशपांडे (संचालक), डॉ. चंद्रशेखर गर्दे, डॉ. श्रद्धा हब्बू , डॉ. रिझवान पिंजारी, डॉ. प्रशांत जोशी, डॉ. अतुल कुलकर्णी, डॉ. श्रीकांत जोशी, हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# वालावलकर रुग्णालयात 'ॲडव्हान्स कार्डीयाक लाईफ सपोर्ट' कार्यशाळा




*डॉ. मंदार अक्कलकोटकर, डॉ. अस्मिता कर्नाळकर व वालावलकर रुग्णलयांतील इतर कर्मचारी*



*डॉ. अस्मिता कर्नाळकर, डॉ. लीना ठाकूर, डॉ. प्रणव श्यामराज, डॉ. मंदार अक्कलकोटकर व वालावलकर रुग्णालयांतील इतर कर्मचारी*

दि. २२.०९.२०२२ व २३.०९.२०२२ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयामार्फत परिचारिका आणि प्रक्षिणार्थी डॉक्टर यांच्याकरिता दोन दिवसाची ए.सी.एल.एस.(ॲडव्हान्स कार्डीयाक लाईफ सपोर्ट) कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत पेशंटचे हृदय बंद पडल्यास त्याकरिता अद्ययावत विविध उपचार पद्धती कशाप्रकारे करण्यात याव्यात याचे प्रशिक्षण डॉ. मंदार अक्कलकोटकर (अमेरिकन हार्ट असोसिएशन इन्स्ट्रक्टर) व डॉ. अस्मिता कर्नाळकर, वालावलकर रुग्णालयच्या भूलतज्ज्ञ, यांनी दिले आणि डॉ. प्रणव श्यामराज (हृदयरोगतज्ज्ञ) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत प्रशिक्षणाआधी आणि नंतर परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर व्याख्यान तसेच विविध प्रकारच्या चित्रफिती दाखवण्यात आल्या. विविध प्रात्यक्षिके दाखवून ती प्रशिक्षणार्थींकडून करून घेण्यात आली. हृदय आजारावरील वेगवेगळ्या प्रकारचे ई.सी.जी. व त्यामधील बदल कसे ओळखावे याबाबत हृदयरोगतज्ज्ञ डॉ. प्रणव श्यामराज यांच्यामार्फत मार्गदर्शन करण्यात आले तसेच कार्यशाळा संपन्न झाल्यावर परीक्षेचे मूल्यमापन करून प्रमाणपत्र देण्यात आले.



डॉ. रोहिणी सामंत रुग्ण तपासणी करताना



डॉ. फुलरेणू चौहान रुग्ण तपासणी करताना



हिंदुजा हॉस्पिटल येथील डॉ. फुलरेणू चौहान (एंडोक्राइनोलॉजिस्ट) व डॉ. रोहिणी सामंत (संधिवात तज्ज्ञ) यांनी भ. क. ल. वालावलकर रुग्णालयाला दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी भेट देऊन भ. क. ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजमधील एम.डी., एम.एस.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले; त्याचप्रमाणे रुग्णालयात गोरगरीब रुग्णांवर उपचार केले.

# क्रीडावार्ता

सप्टेंबर महिन्यात एसव्हीजेसीटी क्रीडा संकुलात विविध संघटनाच्या जिल्हास्तरीय स्पर्धांचे तसेच प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन आयोजित कुमार गट जिल्हा अजिंक्यपद आणि निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धकांचा दिवसेंदिवस वाढत जाणारा सहभाग पाहून स्पर्धा आयोजन करण्याचा उत्साह वाढतो. या क्रीडा संकुलातील सुविधांचा शिस्तबद्ध वापर करण्याची मुभा तसेच महिला खेळाडूंसाठी स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील सर्वच खेळांची गुणवत्ता वाढीस लागली आहे. केवळ रत्नागिरीच नव्हे तर सांगली, कोल्हापूर, मांढरदेवी (सातारा) आणि महाड येथील खेळाडूंचे संघ येथे संपूर्ण पावसाळी हंगाम सराव करतात, हे पाहून आनंद झाला अशा भावना रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे संदीप तावडे यांनी व्यक्त केले. स्वतः खेळाडू असलेला आणि आता एक यशस्वी प्रशिक्षक म्हणून नाव कमावलेला अविनाश पवार याच्या मार्गदर्शनाचा लाभ घेणारी येथे कायमस्वरूपी सराव करणारी ६० मुले आहेत, हे पाहून क्रीडा संकुल निर्मितीचा हेतू नक्कीच यशस्वी झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

छत्तीसगढ येथे आयोजित केल्या गेलेल्या ३३ व्या पश्चिम विभागीय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत मंडणगड येथील रहिवासी आणि एसव्हीजेसीटी क्रीडा संकुलातील मैदानावर २ वर्षे सराव करणाऱ्या क्रांती म्हसकर हिने २० वर्षांखालील लांब–

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५ ६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

उडी या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक जिंकले. याच स्पर्धेत शुभम सूर्यवंशी याने १४ वर्षांखालील गटात ६० मीटरमध्ये रौप्यपदक तर ऋतुराज नाळे याने २० वर्षांखालील मुलांच्या गटात ४०० मीटर हर्डल्स या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक जिंकले. वरील दोन्ही खेळाडू सांगलीचे असून क्रीडासंकुलात गेली २ वर्षे सराव करीत आहेत. नाशिक येथे संपन्न झालेल्या राज्य मैदानी स्पर्धे-तही डेरवणमध्ये सराव करणाऱ्या खेळाडूंनी उत्तम यश संपादन केले. ५००० मी. धावणे या क्रीडाप्रकारात बाळू पुकळे याने सुवर्णपदक जिंकले तर आकांक्षा शेलार हिने ५००० मी. धावणे या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक, विशाखा साळुंखे हिने कांस्यपदक जिंकले. Heptathlon मध्ये संपदा ढमाळ हिने रौप्यपदक तर संदीप जोयशी याने १५०० मी. धावणेमध्ये कांस्यपदक जिंकले. ३००० मी. स्टीपलचेसमध्ये हर्षवर्धन दबडे याने रौप्यपदक जिंकले. हे सर्व खेळाडू मांढरदेव ॲथलेटिक्स फाउंडेशनचे असून ४ महिने डेरवण संकुलातील सिंथेटिक ट्रॅकवर कसून सराव करीत आहेत. सिंथेटिक ट्रॅकवर केलेला सराव आणि कोकणातील दमट हवामान यामुळे खेळाडूंची गुणवत्ता वाढीस लागून त्याचा फायदा खेळाडूंना झाला असे मत, प्रशिक्षक राजगुरू कोचाळे यांनी व्यक्त केले.

कोल्हापूर येथील सागर पाटील जलतरण तलावात झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत श्रीया पाकळे हिने ५० मि. ब्रेस्टस्ट्रोक या क्रीडाप्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.





ॲथलेटिक्स स्पर्धेतील क्षणचित्रे





मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०